# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५/फाल्गुन १३, १९४६ शके

१७. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

(१) **डॉ. विश्वजित कदम, वि.स.स. यांचा ठराव क्र. ९०**
"पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महानगरपालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३०**
"महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असून तो मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयांना स्पर्शून जातो, सदर जिल्हयातील जनतेचे मासेमारी हे पारंपारीक प्रमुख उत्पन्नाचे व जीवीताचे साधन असताना राज्यशासनाचे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असणे या जिल्हयांना सोईचे ठरत नसल्यामुळे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली आहे. त्या शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. २७**
"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (**Trama Center**) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (**Trama Center**) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

(४) **<u>श्री विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा ठराव क्र. २</u>**

"राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने हया सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **<u>श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांचा ठराव क्र. ७३</u>**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ४ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे**
**सचिव- १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

<u>याची प्रत:</u>

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)